(Byhand)

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-नमाशा-१०९८/[१४८/९८]/माशि-१.
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ११ जून, १९९८.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
पुणे

विषय:-१९९७-९८ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत...

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयास अनुसरुन खाली नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थेस त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून १९९७-९८ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्वावर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास या आदेशाव्दारे शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नांव | ठिकाण | माध्यम | इयत्ता |
|---|---|---|---|
| श्री. दत्त शिक्षण संस्था, भिवडी, ता. पुरंदर, जि. पुणे. | भिवडी ता. पुरंदर, जि. पुणे. | मराठी | ८ वी |

२. सदर संस्थांना माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींचा तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

अ] या नवीन माध्यमिक शाळांना शासनाने विहित केलेल्या सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय राहील.

ब] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पूर्तता केल्याची खात्री करुन संबंधित संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची परवानगी

...२

TRUE COPY
HEAD MASTER
HUTATMA UMAJI NAIK HIGH SCHOOL
BHIVADI, TAL- PURANDAR, DIST- PUNE.

Scanned with OKEN Scanner

देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५] सदर संस्थेमार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावांचा संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

६] माध्यमिक शाळा संहिता नियम २.८ मधील तरतूदीनुसार संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असल्याबाबत खात्री करुन घ्यावी. संबंधित संस्थेकडून संस्थेच्या नांवे बँकेत रु. ३०,०००/-किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम जमा असल्याबाबतचे प्रमाणपत्र [बँक बॅलन्स सर्टिफिकेट] घेण्यात यावे.

७] शाळा सुरु करण्यास परवानगी दिल्याच्या ठिकाणी प्राथमिक शाळेतील इयत्ता ७ वी च्या वर्गातील पटसंख्या किमान २० आहे [आदिवासी, डोंगराळ व अल्पभाषिक विभागासाठी किमान १५ आहे.]

८] संस्थेने मागील तीन वर्षांचे प्रमाणित लेखा विवरणपत्रे सादर केली आहेत.

४. वरील शर्तींची व अटींची पूर्तता केल्याची काटेकोरपणे पडताळणी केल्यानंतरच सदर माध्यमिक शाळांना परवानगी दिली जाईल अशी दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घ्यावी.

५. नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी दिलेल्या ठिकाणी असलेल्या प्राथमिक शाळेतील इ. ७ वी ची पटसंख्या २० [आदिवासी, डोंगराळ व अल्पभाषिक विभागासाठी १५] नसल्यास अशी प्रकरणे शासनाकडे पंधरा दिवसांच्या आत पाठवावीत.

६. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल शासनास त्वरित सादर करण्यात यावा.

[ र. वि. झोंपे ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१] शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२] शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जि. प. पुणे.
३] मा. शालेय शिक्षण मंत्री व शालेय शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.